Sanjeevanee Mahavidyalaya
CHAPOLI
Tq Chakur Dist.Latur

महाराष्ट्र शासन

**सांस्कृतिक कार्य संचलनालय**

**आणि**

**संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर जि. लातूर**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

**बाबुजी /गदिमा /पुलं महात्रयींची जन्मशताब्दी**

**(२०१८-२०१९) वर्षानिमित्त**

**लेखन / काव्य / संगीत कार्यशाळा**

**दि. ११ डिसेंबर २०१८**

# अहवाल

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय व्दारे जेष्ठ साहित्यिक / गायक /संगीतकार पु.ल. देशपांडे, ग.दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने लेखन /काव्य /संगीत कार्यशाळेचे आयोजन करण्याचा सन्मान महाराष्ट्रात प्रथम दि. ११ डिसेंबर २०१८रोजी संजीवनी महाविद्यालयात, चापोली ता.चाकूर जि. लातूरला मिळाला.

तत्पूर्वी झालेल्या कार्यशाळेसंबंधीच्या बैठकीत आदरनीय श्री. विनोदजी तावडे साहेब (शिक्षण, उच्च शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री ) यांनी संजीवनी महाविद्यालयाची निवड घोषित केली. दि.०७/१२/२०१८ रोजी व त्यासंबंधी फोनवरुन कार्यशाळेसंबंधीच्या यशस्वीतेसाठी चर्चा करुन प्रथमसन्मान मिळाल्याबददल अभिनंदन केले.

ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे संस्थेचे सचिव डॉ. नारायणराव चाटे (डि.लिटस) अध्यक्षतेखाली दि.०८/१२/२०१८ रोजी प्राध्यापकांची व शिक्षकत्तेर कर्मचाऱ्यांची बैठक घेवूनविविध समित्या स्थापन करण्यात आल्या.

या कार्यशाळेसाठी तीन वेगवेगळे सभागृह, काव्य कार्यशाळा सभागृह व लेखन कार्यशाळा सभागृह संगीत कार्यशाळा सभागृह सर्व सोईंनी सुसज्ज करण्यात आले. या कार्यशाळेसाठी वेगवेगळया सभागृहात सर्व प्रकारच्या सुविधांचे नियोजन करण्यात आले होते.

लेखन -काव्य-संगीत कार्यशाळेचे उदघाटन दि.११ डिसेंबर २०१८ रोजी ठिक ९:३० वाजता, उदघाटक लातूर विभागीय मंडळाचे सचिव सुप्रसिदध कवि शशिकांत हिंगोणेकर,

Sanjeevanee Mahavidyalaya CHAPOLI Tq. Chakur Dist.Latur

कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय श्री डॉ.नारायणराव चाटे, महाराष्ट्र शासनांनी नेमणूक केलेले [illegible] महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय चाटे सर, उपप्राचार्य डॉ भालचंद्र चाटे, कार्यशाळेचे समन्वयक प्रा.नामदेव सोडगिर व प्रा.संदिपमुढे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

लेखन-काव्य-संगीत कार्यशाळेसाठी सहभागी विद्यार्थी व कलाक्षेत्रातील महिला-पुरुष यांनी महाविद्यालयात दि.०८/१२/२०१८ ते ११/१२/२०१८ रोजी प्रवेशिका नोंदणी लिहून प्रवेशिका समितीकडे विनामुल्य सुपूर्द करण्यात आले. प्रत्येक कार्यशाळेसाठी लेखन - १००, काव्य १००तसेच संगीत १०० याप्रमाणे विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.

नियमानुसार एकावेळी एकाच कार्यशाळेत सहभाग नोंदवण्यात आला. कार्यशाळेसाठी महाविद्यालयाच्या परिसरात कार्यशाळेचे बॅनर, स्वागत कमानी, रांगोळया व विशेषकरुन महात्रयींच्या रांगोळी कलाकृतीने सर्वांचे लक्ष वेधुन घेतले.

लेखन-काव्य- संगीत कार्यशाळेसाठी उदधाटन समारंभाचे उदधाटक अध्यक्ष महाराष्ट्र शासनांनी नेमणूक केलेले मर्गदर्शक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, सहभागी कलाकार यांचे स्वागत कमानीपासून ते उदधाटक समारंभास्थळी हालगी वाजून व वासुदेवांनी टिळीम टिळीम टाळ वाजवत स्वागत करण्यात आले.

कार्यशाळेच्या स्वागत समारंभासाची सुरुवात स्वागत गीताने करण्यात आली त्यानंतर सर्व. मान्यवरांच्या हस्ते पु.ल देशपांडे, ग.दि. माडगुळकर आणि सुधीर फडके या महात्रयींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व दिपप्रज्वलन करुन श्रीफळ फोडून कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली.

सर्व मान्यवरांचे सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मान चिन्ह देवून करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सरांनी मांडले त्यानंतर कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून लाभलेले कवि शश्किांत हिंगोणेकर यांनी उपस्थित सहभागी कलावंताना, कार्यशाळेसंबंधी मार्गदर्शन केले. या वेळी महाविद्यालयातील सजावट, रांगोळया, नियोजन पाहून मार्गदर्शकांनी आपले मत आनंदाने, उत्साहाने व मन भारावून गेले असे व्यक्त केले.

कार्यशाळेचे उदघाटक मा.श्री. शशिकांत हिंगोणेकर यांनी मार्गदर्शन पर भाषणात साहित्य-कला संगीत क्षेत्रात आपल्या अंगी असणाऱ्या कला-गुणांना वाव देण्यासाठी महाराष्ट्र

Sanjeevanee Mahavidyalaya CHAPOLI Tq. Chakur Dist.Latur

शासनाचा हा स्तत्य असा उपकृम संजीवनी महाविद्यालयात राबवला जातोय या बददलआनंद व्यक्त केले.

कार्यशाळेच्या उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री नारायणरावजी चाटे साहेबांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात महाराष्ट्र शासन राबवत आसलेली ही कार्यशाळा घेण्याचा प्रथम मान आपल्या महाविद्यालयास मिळाला त्याबददल कृतणता व्यक्त केली व सहभागी कलावंताना कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या.

उदघाटन झाल्या नंतर कार्यशाळेच्या प्रथम सत्रात सुरुवात झाली. लेखन कार्यशाळा काव्य कार्यशाळा व संगीत कार्यशाळा हया तीन वेगवेगळया सभागृहात घेण्यात आली. या प्रसंगी कार्यशाळेसाठी सहभागी कलाकारांनी आपआपल्या कार्यशाळेत उपस्थिती लावली होती.

लेखन कार्यशाळा ही मार्गदर्शक १) श्री मकरंद जोशी २) श्री मोहन शिरसाठ हयाच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली.लेखन कार्यशाळेत सहभागी कलाकारांना कथा लेखन,गद्यलेखन, नाटक लेखन कादंबरी साहित्य लेखन व लेखन प्रकारातील सविस्तर मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक लेखनातील बारकावे समजून घेतले या प्रसंगी लातूर विभागीय मंडळाचे सचिव शशिकांत हिंगोणेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे इ. उपस्थीत होते.

काव्य कार्यशाळेसाठी महाराष्ट्र शासनानी नेमणूक केलेले मार्गदर्शक डॉ रेणुकादास देशपांडे व रमा नाडगौडा यांच्या मार्गदर्शनाखाली काव्य कार्यशाळा राबवण्यात आली. हया कार्यशाळेसाठी उत्सर्फुतसहभाग विद्यार्थ्यांनी घेतला होता. मार्गदर्शकानी काव्यातील असणारे नियमावली व शब्दरचना मांडणी याबददल माहिती दिली. सहभागी कवींनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले व मार्गदर्शकानी मार्गदर्शन केले. हयावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे सर, देगलूर महाविद्यालयाचे प्रा. डॉ जंबाले सर व इतर उपस्थित होते.

संगीत कार्यशाळेसाठी मार्गदर्शक प्रा. कृष्णा लव्हेकर यांनी संगीत कार्यशाळेबददल सविस्तर मार्गदर्शन करुन संगीतातील वेगवेगळे पैलू व त्यांचे प्रात्याक्षिक करुन दाखवले. त्यानंतर सहभागी कलाकारांनी आपली कला सादर केली. वासुदेवांनी टाळ वाजवण्याचे सादरीकरण केले व ते टाळसहभागी इतर कलाकारांनी शिकून घेतले तसेच ढोलकी, मृदंग, तबला, बासरी व संगीतातील विविध प्रकारची अविस्कार संगीत कार्यशाळेत झाली. या प्रसंगी श्री डॉ नारायणराव चाटे साहेब (संस्थेचे सचिव) प्राचार्य डॉ धनंजय चाटे, प्रा. संदीप मुढे, प्रा. डॉ कागणे, प्रा. डॉ धावारे व इतर उपस्थित होते.

लेखन-काव्य-संगीत कार्यशाळेसाठी संजीवनी महाविद्यालयास [illegible] आमदार श्री विक्रम काळे साहेबांनी भेट देवून कार्यशाळेतील सहभागी कलाकारांच्या कलेला दाद दिली व मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी उपस्थित प्रमुख मार्गदर्शका सोबत चर्चा करताना शिक्षक आमदार विक्रम काळे साहेब, मा. श्री डॉ नारायणराव चाटे साहेब (मा. बांधकाम व आरोग्य सभापती जि.प. लातूर) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय चाटे सर यांनी संजीवनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यासर्वांगिन विकासासाठीचे योगदान व अथक मेहनत याबददल आनंद व्यक्त केले.

कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी सर्व मार्गदर्शक श्री डॉ. नारायणराव चाटे साहेब, प्राचार्य डॉ.धनंजय चाटे व सहभागी विद्यार्थ्यांनी,अश्याप्रकारच्या कला गुणांना वाव देणारी कार्यशाळा, संजीवनी महाविद्यालयात राबवली जाते व यशस्वीरित्या उत्कृष्टपणे, नियोजनबदध घेतली गेली याबददल आनंद व्यक्त केला.

या महाराष्ट्रातील पहिल्या कार्यशाळेस वृत्तपत्र व विविध वाहिण्यांनी भरभरुन प्रसिध्दी दिली. दि. ११.१२.२०१८ रोजी सायं.७ वाजताच्या बातम्यामध्ये दुरदर्शन, सहयाद्री वाहीनीने दोन मिनिट या कार्यशाळेची बातमी दाखवून या कार्यशाळेचे कौतूक केले. साम टि.व्ही. गाव माझा,महावार्ता न्युज चॅनल, डी.डी. न्युज या वाहिण्यांनी या कार्यशाळेचे पेक्षेपण दाखवून संपूर्ण देशभर प्रसिध्दी दिली. तसेच महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, सकाळ, पुण्यनगरी, एकमत, गावकरी, यशवंत, सम्राट, पुढारी, युवा छत्रपती अशा सर्व वर्तमानपत्रांनी ठळकपणे व सविस्तर, फोटोसह या कार्यशाळेस प्रसिध्दी देऊन कौतूक केले.

मा. विनोदजी तावडे शिक्षण व क्रिडा सांस्कृतिक मंत्री यांनी ज्या अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील पहिल्या कार्यशाळेच्या आयोजनाचा मान ग्रामिण भागातील संजीवनी महाविद्यालयास दिला या विश्वासास पात्र राहून आगळी वेगळी कार्यशाळा घेवून महाविद्यालयाने महात्रयींस जन्मशताब्दी निमित्त अभिवादन केले.

**डॉ.धनंजय ना.चाटे**
(एम.एस्सी.,बी.एड.,एम.फील.,पी.एचडी.)
**प्राचार्य**
संजीवनी महाविद्यालय चापोली
ता.चाकूर जि.लातूर